**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२४/नों. क्र.२१८१/त.क्र.१३१/२४/०१

प्रति,
श्रीम.साक्षी एन.पी.
९/४६७, बी विंग, सायन शिवाली सीएचएसएल,
एमएचबी कॉलनी, सायन कोळीवाडा, सरदार नगर नं.१
मुंबई-४०० ०२२.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (एफ/उत्तर विभाग)
बृ.मुं.म.पा. सहा.आयुक्त एफ/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
२ रा मजला, ९६ भाऊ दाजी मार्ग, माटुंगा, मुंबई-४०० ०१९.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | ०६.१२.२०२२ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **२४.०४.२०२४** |
| तक्रारदार | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि.०८.०९.२०२२ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.९५२/२२ नुसार Action taken on illegal hawkers/vendors (Tomato, pineapple, garlic, fruits, watermelon vendors) carrying business with their thela on the road and opp.of the address society माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि.०८.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येते की, अपिलकर्ता यांनी मूळ माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली उर्वरित माहिती म्हणजेच रिडीमशन रजिस्टरची प्रत व छायाचित्रे इ. अपिलकर्तांना १५ दिवसात स्पीड पोस्टने नि:शुल्क पाठविण्यात यावीत. तथापि, माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.०६.१२.२०२२ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनु.) एफ/उत्तर श्री.जगदिश पाटील यांनी दि.३०.०९.२०२२ नुसार अपिलकर्तांना केलेल्या कारवाईचा अभिलेख पाठविला व अतिरिक्त माहिती हवी असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्ष संपर्क साधावा असे उत्तर दिले.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री.नितीन पगारे, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन एफ/उत्तर श्री.जगदिश प्रभाकर पाटील उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित अनुपस्थित.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार यांनी सूचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन एफ/उत्तर श्री.जगदिश प्रभाकर पाटील यांना उपलब्ध माहिती (रिडीमशन रजिस्टर) द्यावे असे आदेश दिले होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन एफ/उत्तर श्री.जगदिश प्रभाकर पाटील यांनी सूचित केले की, अपिलकर्तांना रजिस्टर पोस्टाने माहिती दिली होती. त्याची प्रत आयोगात सादर केली आहे. जन माहिती अधिकारींनी दि.०५.१०.२०२२ रोजी पाठविलेली माहिती अपिलकर्तांना प्राप्त झाली आहे.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission ★ Maharashtra ★

मुंबई
दिनांक : २४.०४.२०२४